महाराष्ट्र शासन

# प्रवेश नियामक प्राधिकरण

८वा मजला, न्यु. एक्सलसियर
बिल्डींग, ए.के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

**महत्वाचे / कालमर्यादा / ईमेलद्वारे**

क्रमांकः संकीर्ण/प्र.क्र.१७०/प्रनिप्रा, /१२२ दिनांक : ५ सप्टेंबर, २०१८.

प्रति,
अधिष्ठाता/प्राचार्य,
सर्व खाजगी व विनाअनुदानित
व्यावसायिक अभ्यासक्रमाची महाविद्यालये,
महाराष्ट्र राज्य

विषय : **शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेची माहिती सादर करणे, प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेची प्रक्रिया....**

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ९ (५) च्या तरतूदींनुसार प्रवेश नियामक प्राधिकरण व प्रत्येक विनाअनुदानित संस्था यांनी प्रवेशाबाबत पार पाडण्यात येणारी कार्ये नमूद केलेली आहे. या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेची माहिती सादर करणे, प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेची प्रक्रिया संपूर्ण ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येणार आहे.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशीत विद्यार्थ्यांची प्रवेश मान्यतेच्या अनुषंगाने संबंधीत सर्व महाविद्यालयांना खालील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१. खाजगी व विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांनी http://www.safalta.org या लिंकवर **दिनांक ६ सप्टेंबर २०१८ ते ३० सप्टेंबर २०१८ पर्यत** महाविद्यालय/अभ्यासक्रम "नोंदणी प्रक्रिया" (निशुल्क) करणे अनिवार्य आहे. विहित कालावधीत जे महाविद्यालय "नोंदणी प्रक्रिया" करण्यास असमर्थ ठरतील, त्यांच्या शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या प्रस्तावास प्राधिकरणाची मान्यता प्राप्त होणार नाही व तद्नुषंगाने विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेच्या अनुषंगाने, भविष्यात कोणताही अनुचित प्रकार घडल्यास, त्यास सर्वस्वी महाविद्यालय/संस्था जबाबदार राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

२. प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती व आवश्यक प्रमाणपत्रे/कागदपत्रे प्राधिकरणाच्या पोर्टलवर सादर करणे/खातरजमा करणे तसेच "प्रक्रिया शुल्क" अदा करणे, ही प्रक्रिया महाविद्यालयांनी **दिनांक १५ सप्टेंबर २०१८ ते १५ ऑक्टोबर २०१८ पर्यंत पूर्ण करणे** आवश्यक राहील, सदर प्रक्रियेकरिता मुदतवाढ देण्यात येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

३. ज्या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया अद्याप सुरु आहे, अशा अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांना नविन वेळापत्रक/सूचना यथावकाश कळविण्यात येईल.

(आ.ए. रायते) भा.प्र.से.
**सचिव,**
**प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई.**

प्रत माहितीकरिता अग्रेषित,-
१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित,-
१. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.
२. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई.
३. संचालक, आयुष संचालनालय, मुंबई.
४. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे
५. संचालक, कला शिक्षण संचालनालय, मुंबई.
६. संचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन, पुणे
७. कुलसचिव, पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपुर

प्रत,-
निवडनस्ती, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई.